# मंगलाबाई भागवत फाऊंडेशन

**वेळ : 3 तास** **मराठी कुमारभारती** **एकूण गुण : ८०**

---

**सूचनाः**

1. आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या सूचनेप्रमाणे काढा.
2. निळ्या शाईच्या पेनाचाच वापर करावा.
3. आकृत्या काढण्यासाठी पेनाचाच उपयोग करा.
4. उपयोजिता लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृती काढण्याची किंवा कृती लिहून घेण्याची आवश्यकता नाही.
5. विभाग ५ – उपयोजित लेखन प्र. ५(अ) (२) सारांशलेखन या घटकाकरता गद्य विभागातील प्र. १ (इ) मधील अपठित उतारा वाचून त्याच उताऱ्याचा सारांश लिहिणे गरजेचे आहे.
6. लेखन नियमांनुसार तसेच नीटनेटके लिहावे.

---

## विभाग १ – गद्य

### पठित गद्य

**प्र.१. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(2)**

1. आकृत्या पूर्ण करा.

i. [ ] — **भाषा वापरताना अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी आवश्यक उपाय** — [ ]

ii. [ ] — **प्रत्ययांची जागा अनेक वेळा चुकते अशी ठिकाणे** — [ ]

शब्दप्रयोगाप्रमाणे वाक्प्रचार हे देखील भाषेची खास शैली असते. 'खस्ता खाणे' मध्ये खस्ता हा खाद्य पदार्थ नाही, हे माहीत आहे ना ? तसेच कंठस्नान घालणे' हा वाक्प्रचार युद्धाविषयीच्या बातम्यांमध्ये असतो. कंठस्नान घालणे म्हणजे गळ्याखालून 'आंघोळ घालणे', असा शब्दशः अर्थ नाही. 'खांद्याला खांदा लावणे' (सहकार्य करणे) आणि 'खांदा देणे' (प्रेताला खांदा देणे) यांतला फरकही लक्षात घ्यायला हवा. एकाऐवजी दुसरे क्रियापद वापरले, तर अर्थाचा अनर्थ होईल. अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यासाठी शब्दकोश वापरण्याची सवय करायला हवी. 'अक्कलवान' म्हणजे हुशार; पण 'अकलेचा कांदा' म्हणजे 'अति शहाणा' हे माहीत नसेल, तर कोण आपले खरे कौतुक करतोय की फिरकी घेतोय, हेच आपल्याला कळणार नाही.

क्रियापद वापरताना त्यापूर्वी नामाला कोणता प्रत्यय लावायचा असतो, हे नीट माहीत नसेल तरीदेखील अर्थाचा गोंधळ होतो. उद. अंगाला लावणे आणि अंगावर घेणे, तिला हसणे (तिची चेष्टा करणे या अर्थी) आणि तिच्याशी हसणे (सहजपणे हसणे) यांत प्रत्यय महत्वाचा आहे. हल्ली सार्वजनिक समारंभांमध्ये आणि वाहिन्यांवर प्रत्ययांची जागा अनेकदा चुकलेली असते. उदा. 'तुझी मदत करणे' याऐवजी 'तुला मदत करणे' हवे. 'त्यांचे धन्यवाद' या ऐवजी 'त्यांना धन्यवाद' असे म्हणायला हवे.

**प्र. 2. i) चौकटी पूर्ण करा.** **(1)**

अ. शब्दांचा अर्थ जाणून घेण्याचे साधन — ______

ब. अकलेचा कांदा म्हणजे — ______

ii) **एका वाक्यात उत्तर लिहा.** **(1)**

भाषेची खास शैली कोणती असते ?

३. **स्वमत** **(3)**

तुम्ही <u>शहाणे</u> आहात' या वाक्यातील शहाणे या शब्दाच्या अर्थछटा लिहा.

**प्र.१. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(2)**

i) आकृत्या पूर्ण करा.

______ — लेखिकेच्या घरामागील उंबराच्या झाडाचे विशेष — ______

पिक्या उंबरांनी व राघूंच्या हिरव्या पंखांनी सुदंर दिसणारे

ii) ______ — लेखिका वाट पाहत असलेल्या कोणत्याही दोन गोष्टी — ______

उंबरावर उतरणारे पोपटांचे थवे

आणखी एक वाट पाहणं होतं पोपटांच्या थव्यांचं. आमच्या घरामागे एक मोठ्ठं उंबराचं झाड होतं. उन्हं तापण्याचे दिवस आले, की त्यांचे थवे उंबरावर येऊन उतरायचे. कशातरीच पानांचं, गाठीगाठीचं ते झाड तेव्हा पिक्या उंबरांनी आणि राघूंच्या हिरव्या पंखांनी इतकं सुंदर होऊन जायचं ! मी वाट पाहायचे त्या थव्यांची. त्या लालसर गोड झालेल्या उंबरांची. माझ्या मनात जाग्या होणाऱ्या कितीतरी कवितांची.

पुढे मग कवितेचं बोट मी चांगलं घट्ट धरुन ठेवलं. तिची माझी मैत्रीच झाली. आपण कधीपण, केव्हापण मैत्रिणीला हाक मारतो, तिच्याकडे धावतो, तिच्याबरोबर भान विसरुन मनातलं वाट्टेल ते बोलतो. इथे फक्त एक फरक होता. तिला हवं तेव्हा ती माझ्याकडे यायची. कधीही रात्री–मध्यरात्रीसुद्धा; पण मला मात्र कधीकधी खूप वाट बघायला लावायची. मी हाक मारल्यावर हमखास येईलच असं नसायचं कवितेचं. मग तिची वाट पाहणं–अस्वस्थ होणं–कशातच मन लागेनासं होणं–आई, आत्याची ती बोलणी खाणं ! आज ते वाट पाहणं आठवलं तरी मी पुन्हा हुरहुरते. उंबराच्या पिकल्या फळांवर पोपटांचे हिरवे पंख पुन्हा उतरुन यावेत, असं उगाच वाटत राहतं.

२. **तुलना करा.** **(2)**

| व्यक्तीशी मैत्री | कवितेशी मैत्री |
|---|---|
| | |

३. **स्वमत.** **(3)**

'वाट पाहणे' या संदर्भातील तुमचा अनुभव लिहा.

**<u>अपठित गद्य</u>**

**प्र.१. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(2)**

1. आकृत्या पूर्ण करा.

**प्रसंगाच्या रेखाटनात यांचा विचार होतो**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

ऐतिहासिक कादंबरी लेखनात इतिहासाच्या गाढ्या अभ्यासाची गरज तर कायमच असते; पण त्याचबरोबर लेखकाची अगाध कल्पनाशक्तीही पणास लावावी लागते. याकरता इतिहासाच्या सत्यतेचे पुरावे, तर असावे लागतातच सोबतच तो इतिहास गुंफण्याकरता योग्य असे दुवे शोधले जातात. इतिहासाचा जो टप्पा कादंबरीतून चित्रित होणार आहे तो कालखंड कल्पून तो शब्दांतून वाचकांसमोर चित्रित करणे हे कादंबरीकाराचे कसबच म्हणावे लागेल. इतिहासातील ती–ती पात्रं, त्यांचे स्वभाव विशेष, त्यांची राहणी, त्यांची प्रकारची विचारसारणी या साऱ्यांचा सखोल विचार करावा लागतो. प्रसंगांच्या रेखाटनातही त्या प्रसंगाचे महत्व, त्याचा कादंबरीवर पडणारा प्रभाव, घटनांचा ओघ, प्रसंगातील बारकावे या साऱ्यांचा विचार होतो. या इतिहासाला कल्पनेची हलकीशी जोड दिली जाते. परिणामी ऐतिहासिक कादंबरीच्या रुपातील सुंदर कलाकृती रेखाटली जाते.

२. (i) **खालील घटनेचे / कृतीचे परिणाम लिहा.** **(1)**

इतिहासाला कल्पनेची हलकीशी जोड दिली जाते.

(ii) **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** **(1)**

ऐतिहासिक कादंबरी लेखनात इतिहासाच्या गाढ्या अभ्यासाबरोबरच....

अ. लेखकाची प्रतिष्ठा पणास लागते.

ब. लेखकाची कल्पनाशक्तीही पणास लागते.


क. लेखकाची विनोदी दृष्टी पणास लागते.

ड. गणिताचे ज्ञानही असावेच लागते.

## विभाग २ – पद्य

**प्र. 2.(अ) कवितेच्या आधार दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(2)**

1. आकृत्या पूर्ण करा.




वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण
जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना
वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू प्रचंड
सुखावतात.
वस्तू निखालस सेवेच असतात आपल्या,
तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.
वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,
त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरुन
निष्कासित न होण्याची हमी द्या.

वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,
हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.
वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे
जाऊन. त्याच जिवंत ठेवणार आहेत
आपला स्नेह नंतरच्या काळतही.
आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या
हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा
कृतज्ञतापूर्ण निरोपाचा हक्क शाबूत ठेवावा.

२. **कारणे लिहा.** **(2)**

(i) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत, कारण......

(ii) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही, कारण................

३. वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन. (2)
त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह
नंतरच्या काळातही, या ओळींचा सरळ अर्थ लिहा.

४. वस्तूंना जीवन नसेलही कदाचित, पण जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना (2)
वस्तूंना मनही नसेल कदचित, पण ते असल्यासारखे वागलो तर वस्तू प्रचंड सुखवतात.'
या काव्यपंक्तींतील काव्यसौंदर्य स्पष्ट करा.

प्र. 2.(आ) खालील मुद्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा (2)

i. भारतवाक्य ii. तू झालास मूक समाजाचा नायक

१. प्रस्तुत कवितेतून व्यक्त होणारा विचार लिहा. (2)

२. प्रस्तुत कवितेची भाषिक वैशिष्ट्ये लिहा. (2)

प्र. 2.(आ) खाली दिलेल्या काव्य पंक्तींचे रसग्रहण करा. (4)

'भातुकतीतून प्रवेशताना वास्तवात, हातांत हात असेल दोघांचाही
ज्यावर सहज विसावेल बाहुली आणि चेंडू जोडीनं.'

## विभाग ३ – स्थूलवाचन

प्र. 3 खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. (6)

i. 'कठोर परिश्रमांमुळेच स्वाती महाडिक यांना स्वत:चा निर्धार पूर्ण करता आला', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

ii. साहित्यिक गिरिजा कीर यांच्या कथेची वैशिष्ट्ये लिहा.

iii.व्युत्पत्ती कोशाचे कार्य या विषयावर टीप लिहा.

## विभाग ४ – भाषाभ्यास

प्र.४अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती.

१. समास

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समासाचे नाव लिहा. (2)

i. पालापाचोळा ii. दशावतार

२. **शब्दसिद्धी**

**खालील शब्दांतील उपसर्ग किंवा प्रत्यय ओळखून लिहा.** **(2)**

अवतरण, रंगारी, सुकर, पडीव

३. **खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचाराचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा.**

**खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समासाचे नाव लिहा.** **(4)**

i. मुहूर्तमेढ रोवणे ii. रणशिंग फुंकणे

iii. खस्ता खाणे iv. मुग्ध होणे

**प्र.४आ. भाषिक घटकांवर आधारित कृती.**

१. **शब्दसंपत्ती**

**i. खालील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **(1)**

अ. पांढरे केस काळे दिसावेत म्हणून लावण्यात येतो तो

ब. लहान मुलांच्या डोक्यावरील जन्मजात असलेले केस

क. सोबत काम करणारे

**ii. गटात न बसणारा शब्द शोधा.** **(1)**

अ. तलाव, तरस, तडाग, तळे

ब. सरिता, सविता, तटिनी, नदी

**iii. विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.** **(1)**

| क्र. | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | आळस | अ. | मांसाहारी |
| २. | शाकाहारी | ब. | उत्साह |
| | | क. | उभयाहारी |

**iv. खालील शब्दांचे वचन बदला.** **(1)**

अ. बातम्या ब. स्त्री

२. **लेखन नियमांनुसार लेखन**

**खालीलपैकी कोणतीही दोन वाक्ये लेखननियमानुसार लिहा.** **(2)**

**i.** ती नीग्रही,करारि आणि धाडसी होती.

**ii.** रेडीओवर रात्री बातम्या सुरु होत्या.

**iii.** सुरुवातीला रुपालींच आणि सोनालींच मूळीच पटेना.

**iv.** महाराष्ट्र ही संतांची भुमी आहे.

३. **विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा.** **(1)**

वा वा मला हे चित्र आवडले

४. **पारिभाषिक शब्द/प्रचलित मराठीतील शब्द** **(1)**

**i)** Exhibition **ii)** National

## विभाग ५ – भाषाभ्यास

**प्र.५अ. खालील कृती सोडवा.** **(2)**

१. **पत्रलेखन**

**खालील जाहिरात वाचा आणि सूचनेनुसार पत्रलेखन करा.**

**'अक्षर'**
**सुलेखन प्रशिक्षण संस्था, बोरीवली**
**अक्षरांची नव्याने ओळख !**
संस्थापक : सुप्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव
* नियमित प्रशिक्षण वर्ग * सुट्टीचे वर्ग
* कार्यशाळांचे आयोजन * मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन
* सुलेखन साहित्य विक्री

वरील कोणत्याही उपक्रमासाठी संपर्क साधा :
अच्युत पालव ******

**शाळेचा कलाप्रमुख या नात्याने सुलेखन कार्यशाळेसाठी लागणारे साहित्य मागवण्यसाठी मागणीपत्र लिहा.**

**किंवा**

**सुलेखन प्रशिक्षण कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी मित्राला/मैत्रिणीला 'उत्कृष्ट सुलेखनकार' म्हणून गौरविण्यात आले, त्याबद्दल तिचे पत्र लिहून अभिनंदन करा.**

**किंवा**

२. **सारांशलेखन**

**विभाग – १ : गद्य (प्र.क्र.१ (इ) मधील अपठित उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५आ. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. (शब्द मर्यादा ६० ते ९० शब्द)** **(10)**

१. **बातमी लेखन**

**खालील विषयावर बातमी तयार करा.**

**आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन, आयोजक रोटरी क्लब.**

२. **कथा लेखन**

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा तयार करा.**

मुद्दे – बेडकांचे राज्य – स्पर्धा – चिकट खांबावर चढणे – बेडकांची माघार – लहान बेडूक – इतरांचे न ऐकणे – स्पर्धा जिंकणे

३. **जाहिरात लेखन**

**खालील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**


**स्वास्थ्य संतुलन**
डायग्नोस्टिक सेंटर

**प्र.५ इ. लेखन कौशल्य** **(8)**

**खालील लेखन प्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्द मर्यादा १०० ते १२० शब्द)**

१. **आत्मकथन**

**खालील मुद्द्यांच्या आधारे पोलीस काकांचे आत्मकथन लिहा.**




२. **वैचारिक लेखन**

**खालील मुद्द्यांच्या आधारे 'स्वच्छ भारत: आजची गरज' या विषयावर निबंध लिहा.**

अस्वच्छता: देशासमोरील मोठी समस्या → इतर देशांशी तुलना → सध्याची परिस्थिती → हक्क व कर्तव्ये यांची जाणीव → 'देश माझा' ही भावना → स्वयंशिस्त

*****